| MHLA140033872023 | | |
|---|---|---|
| | दाखल दिनांक : | २१.१०.२०२३ |
| | नोंदणी दिनांक : | २१.१०.२०२३ |
| | निकाल दिनांक : | २७.०७.२०२६. |
| | कालावधी : | ०२ व, ०९ म. १६ दि. |

**प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी (न्यायालय क्रमांक ०२), औसा, तालुका औसा, जिल्हा लातूर यांचे न्यायालयात.**

**(पिठासीन अधिकारी श्रीमती एस. डी. साबळे)**

नियमित फौजदारी खटला क्रमांक ६१९/२०२३　　　निशाणी क्रमांक २८

(पोलीस ठाणे, भादा गुन्हा नोंद क्रमांक २०३/२०२३)

**भाग "अ"**

| | | |
|---|---|---|
| अभियोग पक्ष | | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत – प्रभारी अधिकारी, पोलीस ठाणे, भादा.<br>तालुका औसा, जिल्हा लातूर. |
| अभियोग पक्षातर्फे विधीज्ञ | | सहायक सरकारी अभियोक्ता **श्रीमती एम.एस.रेचवाडे** |
| | | ***विरुध्द*** |
| आरोपी | | १. **आप्पाराव रुपा राठोड,**<br>वय ५५ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>२. **अनिल आप्पाराव राठोड,**<br>वय २५ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>३. **सुनिल आप्पाराव राठोड,**<br>वय २३ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>तिघेही रा. एकंबी तांडा ता. औसा जि. लातुर |
| आरोपींतर्फे विधीज्ञ | | **श्री. एफ. एस. पटेल.** |

## भाग "ब"

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | दि. २४.०९.२०२३ |
| गुन्हा दाखल दिनांक | २५.०९.२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | २१.१०.२०२३ |
| दोषारोप तयार केल्याचा दिनांक | २१.०७.२०२६ |
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | २१.०७.२०२६ |
| न्यायनिर्णयास ठेवल्याचा दिनांक | २७.०७.२०२६ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | २७.०७.२०२६ |
| दोषी ठरल्याचा दिनांक, जर असल्यास | नाही. |

## आरोपींची सविस्तर माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष अथवा दोषी | शिक्षा दिली असल्यास किती | न्यायालयीन बंदी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **आप्पाराव रुपा राठोड** | फौ.प्र.सं ४१ (१) अन्वये नोटीस | १९.०६. २०२६ | भा. दं. वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ | निर्दोष | – | – |
| २. | **अनिल आप्पाराव राठोड** | फौ.प्र.सं ४१ (१) अन्वये नोटीस | १९.०६. २०२६ | भा. दं. वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ | निर्दोष | – | – |
| ३. | **सुनिल आप्पाराव** | फौ.प्र.सं ४१ (१) | १९.०६. २०२६ | भा. दं. वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह | निर्दोष | – | – |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **राठोड** | अन्वये नोटीस | | कलम ३४ | | | |

## भाग "क"

## अभियोग /आरोपीतर्फे/ न्यायालयीन साक्षीदार यांची यादी

### अ. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार

| साक्षीदार | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| सा. क्र.०१ | दत्ता लिंबा राठोड (नि.क्र. २०) | फिर्यादी |

### ब. आरोपीतर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | | |

### क. न्यायालयीन साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | | |

## अभियोग पक्ष/आरोपी/न्यायालयीन पुराव्यांची यादी

### अ. अभियोग पक्षाचा पुरावा

| **निशाणी क्र.** | **कागदपत्रांचे वर्णन** |
|---|---|
| **२१** | फिर्यादवरील सही |
| **२२** | घटनास्थळ पंचनामा |
| **२३ ते २६** | वैद्यकीय प्रमाणपत्र |

### ब. आरोपीतर्फे पुरावा

| निशाणी क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|

| |
|---|
| निरंक |

**क. न्यायालयीन पुरावा**

| निशाणी क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | | |

**ड. मुद्देमाल**

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | | एक लाकडी काठी साल नसलेली ज्यांची लांबी ३ फुट ३ इंच अंदाजे लांबीची गोल आकार सरळ असलेली |

## न्या य नि र्ण य

**( घोषीत केल्याचा दिनांक २७ माहे जुलै, २०२६ )**

आरोपींवर भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४, ३२३, ५०४ आणि ५०६ सह वाचनीय कलम ३४ अन्वये दंडनीय गुन्ह्यांसाठी खटला चालवला.

**अभियोग पक्षाची हकिकत थोडक्यात खालील प्रमाणेः–**

**०२**. दि. २४.०९.२०२३ रोजी रात्री ८.३० वा वाजण्याच्या सुमारास एकंबी तांडा ता. औसा येथे फियादीचे राहते घरी दत्ता लिंबा राठोड, त्यांची पत्नी सविता राठोड, मुलगा व त्यांची आई असे घरी असताना त्यांच्या घरासमोर कोणीतरी लिंबु टाकल्याने ते कोणाचेही नाव न घेता शिव्या देत होते. त्यावेळी त्यांचे नात्यातील आप्पाराव रुपा राठोड, अनिल आप्पाराव राठोड, सुनिल आप्पाराव राठोड यांनी तुम्ही आम्हांला शिवीगाळ का करता असे म्हणुन फिर्यादी व त्यांच्या पत्नीला शिवीगाळ केली. त्यांच्या पत्नीच्या केसाला

धरुन आप्पाराव राठोड याने लाथाबुक्यांनी मारहाण केली. अनिल राठोड यांनी त्यांना काठीने उजव्या हाताचे मनगटावर मारहाण केली त्यामुळे त्यांना मुक्का मार लागला. त्यावेळी त्यांचा मुलगा सचिन दत्ता राठोड व आई सविता राठोड हे दोघे भांडण सोडविण्यास आले असता त्यांच्या मुलास सुनिल आप्पाराव राठोड याने त्यांच्या हातातील काठीने डाव्या पायावर मारहाण केली. फिर्यादीच्या आईस आप्पराव याने दगडाने पाठीत मारले. तसेच त्यांनी फिर्यादी व साक्षीदार याना जिवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे फिर्यादीने आरोपींविरुध्द सदरची फिर्याद भादा पोलीस ठाण्यात दाखल केली.

**०३**. सदर फिर्यादीवरुन गु.रं.क्र. २०८/२०२३ ने नोंद होवून तपास अधिकारी आर.एम. घोगरे यांच्याकडे आला. सदर प्रकरणात तपासिक अधिकारी यांनी घटनास्थळास भेट देवून घटनास्थळ पंचनामा केला, साक्षीदारांचे जवाब नोंदविले, वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले व तपासाअंती आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**०४.** मी आरोपी क्रमांक ०१ ते ०३ विरुध्द नि.क्र.१६/अ अन्वये दोषारोप निश्चित केला. सदरील दोषारोपातील मजकूर आरोपींना त्यांचे भाषेत समजावून सांगण्यात आला. आरोपींनी दोषारोप मान्य नसल्याचे सांगून संपरिक्षा घेण्याची मागणी केली.

**०५**. अभियोग पक्षातर्फे श्रीमती एम.एस.रेचवाडे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपींतर्फे श्री. एफ.एस. पटेल विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. उपलब्ध पुराव्यावरुन व दोन्ही वकिलांच्या युक्तीवादावरुन खालील प्रमाणे मुद्दे विचारात माझेसमोर उपस्थित झाले असून मी त्यांचा निष्कर्ष खालील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | दिनांक २४/०९/२०२३ रोजी रात्री ८.३० वाजता | नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| | मौजे एकंबी ता. औसा येथे फिर्यादीच्या राहते घरासमोर आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीच्या उजव्या हाताच्या मनगटाजवळ काठीने मारुन गंभीर जखमी केले आणि त्याद्वारे त्यांनी कलम ३२४ भारतीय दंड विधान सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | |
| ०३. | वर नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन ईच्छापूर्वक फिर्यादी व इतर साक्षीदारांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन किरकोळ दुखापत केली आणि त्याद्वारे कलम ३२३ भारतीय दंड विधान सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय? | नकारार्थी. |
| ०४. | वर नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमताने फिर्यादीचा उद्देशपूर्वक अपमान केला व त्यायोगे त्याला प्रक्षोभीत केले जेणेकरुन फिर्यादी कडून सार्वजनिक शांतता भंग व्हावी किंवा इतर कोणताही अपराध घडावा आणि त्याद्वारे कलम ५०४ भारतीय दंड विधानाचे सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नकारार्थी. |
| ०५. | वर नमुद दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपीने संगनमत करुन फिर्यादीस फौजदारीपात्र धाकदपटशा करुन धमकी दिली आणि त्याद्वारे त्याने भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ५०६ सह ३४ अन्वये गुन्हा केला हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नकारार्थी. |
| ०६. | आदेश काय? | आरोपींची निर्दोष मुक्तता केली. |

०६. अभियोग पक्षाने सा.क्र. ०१ फिर्यादी दत्ता लिंबा राठोड (नि.क्र. २०) यांना तपासले. फिर्यादी व आरोपी यांनी नि.क्र. १९ प्रमाणे तडजोड पुरसीस दाखल केली. अभियोग पक्षाचा पुरावा निशाणी क्र. ०१ वर आदेश पारीत करुन बंद करण्यात आला.

## का र ण मी मां सा

**मुद्दे क्रमांक ०१ ते ०५ बाबत एकत्रीत –**

०७. मुद्दा क्र. १ ते ५ हे परस्परांशी निगडीत असल्यामुळे व विश्लेषणाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी एकत्रीत विश्लेषीत करण्यात येत आहेत.

०८. अभियोग पक्षाने आरोपी विरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी साक्षीदार क्र.१ फिर्यादी यांना नि.२० कडे तपासले. त्यांनी त्यांच्या पुराव्यात ते आरोपींना ओळखतात. ते त्यांच्या मामांची मुले आहेत. घटना कधी व कोठे घडली हे त्यांना आठवत नाही. आरोपी हे नातेवाईक असल्यामुळे त्यांच्यात गैरसमजुतीने किरकोळ वाद झाला होता. त्यांनी आरोपीं विरुध्द फिर्याद दिल्याचे कथन केले आहे. तसेच त्याने फिर्यादवरील त्यांची सही जरी मान्य केली असली तरी त्यातील मजकूर माहिती नसल्याचे कथन केले आहे.

०९. फिर्यादी हे सरकारपक्षास सहाय्य करीत नसल्यामुळे सरकारी वकीलांनी त्यांची मे. न्यायालयाच्या परवानगीने उलटतपासणी घेतली. त्यामध्ये त्यांनी आरोपींनी काठीने त्यांच्या मारुन जखमी केल्याचे नाकारले आहे. तसेच अधोरेखांकित भाग "अ" हा त्यांच्या फिर्यादमध्ये का नमूद केला आहे याचे कारण सांगता येणार नसल्याचे देखील त्यांनी कथन केले आहे.

१०. प्रस्तुत खटल्यात फिर्यादी हे महत्वाचे साक्षीदार आहेत. परंतु सदर साक्षीदार

यांनी अभियोगपक्षाच्या समर्थनार्थ साक्ष दिलेली नाही. पुराव्यादरम्यान फिर्यादी यांनी त्यांचे व आरोपींमध्ये न्यायालयाबाहेर आपसात तडजोड नि.क्र. १९ झाल्याचे मान्य करुन त्यांना आरोपीं विरुध्द प्रस्तुतचे प्रकरण चालवायचे नसल्याचे कथन केले आहे. त्यामुळे इतर साक्षीदारांची साक्ष नोंदवूनही त्याचा फारसा उपयोग अभियोगपक्षास होणार नसल्याने अभियोगपक्षाचा पुरावा नि.क्र. ०१ वरील आदेशाप्रमाणे बंद करण्यात आला. तसेच आरोपीविरुध्द आरोप सृदश विधाने अभिलेखावर न आल्याने आरोपींचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये जबाब तोहमत करण्यात आला. दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

**११.** फिर्यादी यांच्या साक्षीवरुन त्यांनी घटना तसेच फिर्यादमधील मजकुर नाकारल्यामुळे फिर्याद अभिलेखावर सिध्द होवु शकली नाही. तसेच फिर्यादीने आरोपींनी त्यांना काठीने मारहाण केल्याचे देखील नाकारल्याने फिर्यादीला झालेल्या जखमा त्यांच्या साक्षीतुन सिध्द होवु शकल्या नाहीत. फिर्यादी व आरोपी आपसांत एकमेकांचे नातेवाईक असल्याने त्यांची न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याने त्यांनी फिर्यादमधील मजकुर नाकारला. त्यामुळे आरोपींविरुध्द त्यांनी फिर्यादी व साक्षीदार यांना इच्छापुर्वक काठीसारख्या घातक हत्याराने गंभीर व किरकोळ दुखापत, तसेच शिवीगाळ करुन धमकी दिली या बाबी संशयाच्या पलीकडे जावुन सिध्द होउ शकल्या नाहीत.

**१२.** फिर्यादी साक्षीदार क्र.१ यांनी निशाणी क्र. २० वरील न्यायालयासमोर दिलेल्या जबाबामध्ये व फिर्याद मधील मजकुरामध्ये तफावत दिसुन येते. त्यामुळे फिर्यादी साक्षीदार क्र. १ यांची साक्ष विश्वासार्ह नाही. प्रस्तुतकामी फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये तडजोड झाले बाबत निशाणी क्र. १९ वर तडजोडपत्र दाखल केले आहे. या ठिकाणी मा.सर्वोच्च न्यायालय यांनी दिलेल्या ***मदन मोहन अबोट विरुध्द पंजाब राज्य, ए.आय.आर. (२००८) एस.सी. १९६९*** या न्यायनिर्णयामध्ये असे निर्देशित केले आहे की,

*"जेव्हा याचिकाकर्त्यावर आरोप केलेले गुन्हे हे पुर्णपणे वैयक्तिक स्वरुपाचे असतात आणि पक्षकारांमधील विवादांवर सौहार्दपुर्ण तोडगा निघाला असेल, तेव्हा खटला चालू ठेवणे न्यायाच्या हिताचे नाही."*

**१३.** फिर्यादी सदर खटल्यातील जखमी साक्षीदार असुन त्याची साक्ष अत्यंत महत्वाची असुन त्याने फिर्यादीमधील मजकुर नाकारल्याने फिर्याद सिध्द होवु शकली नाही. तसेच आरोपीतर्फे घटनास्थळ पंचनामा, वैद्यकीय प्रमाणपत्रे मान्य करण्यात आली असली तरी फिर्यादीला झालेल्या जखमा या आरोपींनी केलेल्या मारहाणीमुळे झाल्या होत्या हे निःसंशयपणे सिध्द होवु शकले नाही. प्रस्तुत प्रकरणात फिर्यादीने तथाकथीत घटना घडली नसल्याचे कथन केले आहे. त्यामुळे अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द असलेला आरोपीचा तपशील हा संशयापलीकडे सिध्द केला नाही. तसेच अभियोग पक्षाने भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ चे घटक शाबीत केलेले नाहीत. करीता वरील सर्व कारणांमुळे आरोपीविरुध्द दोषारोप निर्विवादपणे सिध्द होत नाही. म्हणुन मुद्दा क्र. १ ते ४ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.

**मुद्दा क्र. ५ करीता –**

**१४.** फौजदारी न्याय प्रणालीचे मुलभुत तत्व असे आहे की, फौजदारी गुन्ह्यामध्ये आरोपीस दोषी धरण्याकरीता त्यांच्यावर ठेवण्यात आलेले दोषारोप अभियोग पक्षाने आरोपीस दोषी धरण्याकरीता त्याच्यावर ठेवलेले आलेले दोषारोप अभियोग पक्षाने संशयापलीकडे सिध्द करणे आवश्यक आहे. परंतु सदरची बाब या खटल्यामध्ये आढळुन येत नाही. मुद्दा क्र. १ ते ४ यांचे निष्कर्ष नकारार्थी नोंदवल्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. या ठिकाणी ***सर्वोच्च न्यायालय यांनी दिलेल्या विजयी सिंग आणि इतर***

***विरुध्द उत्तर प्रदेश राज्य, (१९९०) ३ एस.सी.सी. १९०*** या न्यायनिर्णयामध्ये असे निर्देशीत केले आहे की,

*'' फौजदार प्रकरणांमध्ये पुराव्याचा सामान्य भार नेहमी फिर्यादीवर असतो आणि तो कधीही बदलत नाही. हे मुळ तत्वापासुन निघेते की, जोर्पत फिर्यादीद्वारे दोषी सिध्द होत नाही. तोपर्यत आरोपी निर्दोष असल्याचे गृहित धरले जाते आणि आरेपीला प्रत्येक वाजवी संशचा लाभ मिळण्याचा हक्क आहे. भारतीय पुरावा कायद्याच्या कलम १०५ मध्ये समाविष्ठ असलेल्या नमुद सर्व घटकांच्या बाबतीतही सर्व वाजवी संशयापलीकडे खटला स्थापन करण्याचे प्रारंभिक ओझे पार पाडण्याचे कर्तव्य फिर्यादीने पार पाडलेले नाही''*

**१५.** अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले असता, फिर्यादीने दिलेली फिर्याद एकतर खोटी असली पाहिजे किंवा फिर्यादी खोटे बालत असली पाहिजे. परंतु, फिर्यादी व अरोपी यांनी निशाणी क्र. १९ नुसार अभिलेखावर त्यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झालेबाबत तडजोडपत्र दाखल केले असल्याने आरोपींविरुध्द दोषारोप सिध्द होवु शकले नाही म्हणुन मुद्दा क्र. ५ च्या निष्कर्षासाठी खालील आदेश परीत करत आहे –

## आदेश

**१.** आरोपी क्र. १. **आप्पराव रुपा राठोड, २. अनिल आप्पाराव राठोड व ३.सुनिल आप्पाराव राठोड** यांची फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम २४८ (१) अन्वये भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

**२.** आरोपींचे जामीनपत्र व वैयक्तिक बंधपत्रे रद्दबातल करण्यात येत आहेत.

**३.** जप्त मुदेमाल एक लाकडी काठी ही मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावी.

**३.** आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७–अ अन्वये मा.अपिलीय न्यायालय येथे हजर राहण्याकरीता प्रत्येकी रु.१५,०००/– (अक्षरी पंधरा हजार रुपये मात्र) चे वैयक्तिक बंधपत्र आणि जामीनबंध द्यावे जे सहा महिने कालावधीकरीता वैध राहील.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SABALE SHITAL DATTATRAY
Date: 2026.07.27 17:55:22 +0530

**( श्रीमती एस. डी. साबळे )**

**दिनांक – २७.०७.२०२६.** **न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग, औसा.**

**ठिकाण – औसा.** **(न्यायालय क्रमांक ०२).**